Since March 2002
An International, Registered & Referred Monthly Journal : **Military Science**
Research Link - 159, Vol - XVI (4), June - 2017, Page No. 132-134
ISSN - 0973-1628 ■ RNI - MPHIN-2002-7041 ■ Impact Factor - 2015 - 2.782

# शीतयुद्धोत्तर काळातीत भारत-अमेरिका संबंधांचे गुणात्मक मुल्यमापन

***अमेरिकेच्या वाढत्या भारत प्रेमामागे अमेरिके हितसंबंध गुंतलेले आहेत, हे भारत जाणून आहे. कारण, अमेरिका एक प्रोफेशनल राष्ट्र आहे. अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणात भाव भावनेला स्थान नसते. जेथून आपल्याला जास्तीत जास्त फायदा होईल आणि आपले महासत्ता स्थान कायम टिकून राहील अशा प्रश्नात अमेरिका सहभागी होत असते. कारण अमेरिकेची परराष्ट्र धोरण ठरविण्याची प्रक्रीया व्यक्ती केंद्रीत नसून संस्थाकेंद्रीत आहे. त्यामुळे अमेरिकेतील शासन हे रिपब्लिक पक्षाचे असो की डेमोक्रॅटीक पक्षाचे, परराष्ट्र धोरणची पायाभूत व दिर्घकालीन उद्दिष्टे कायम राहतात. जो थोडाफार बदल होतो, तो अल्पकालीन उद्दिष्टांमध्ये. ही उद्दिष्टे अल्पकालीन व परिस्थितीनुरुप असल्यामुळे तत्कालीन शासनव्यवस्था किंवा राष्ट्राध्यक्ष त्यात थोडाफार बदल करू शकतो.***

**प्रा.डॉ.व्हि.वाय.जाधव* एवं प्रा.जितेंद्र आनंदा माळी****

**प्र**स्तावना :

भारताच्या स्वातंत्र्यापासून ते शीतयुध्दाच्या समाप्तीपर्यंत भारत–अमेरिका संबंध तणावपूर्ण राहिले होते. जगातील सर्वात मोठी लोकशाहीव्यवस्था असणारा भारत आणि जगातील सर्वात जूनी व सामर्थ्यवान लोकशाही असलेली अमेरिका या काळात परस्परांचे मित्रही नव्हते आणि शत्रूही नव्हते. कारण शीतयुध्दाच्या राजकारणावर आधारीत अमेरिकेचे साम्यवाद विरोधी जागतिक धोरण आणि अलिप्ततावादाच्या तत्वांवर आधारीत भारताचे परराष्ट्र धोरण परस्परविरोधी होते. या काळात दोन्ही राष्ट्रांची राजकीय ध्येये हितसंबंध व त्यासाठी वापरण्यात येणारी साधने परस्पर भिन्न असल्याकारणाने उभयराष्ट्रांमध्ये मैत्री किंवा सहकार्याच्या विकासाला फारसा वाव नव्हता. त्यातच भारतावरील पुर्वाश्रमीचे राज्यकर्त्ये राष्ट्र ब्रिटन अमेरिकेचे मित्र असल्याकारणाने भारताचा अमेरिकेकडे पाहण्याचा दृष्टीकोन साशंक होता. तर अमेरिका नुकत्याच स्वतंत्र झालेल्या भारताला आपल्या साम्यवाद विरोधी मोहिमेत सहभागी करु इच्छित होता. साहजिकच शीतयुध्दकाळात दोन्ही राष्ट्रे आंतरराष्ट्रीय राजकारणात अलिप्तपणे वावरतांना दिसून येतात.

परंतु शीतयुध्दोत्तर काळात परिस्थिती झपाटयाने बदलली. शीतयुध्दाच्या दृष्टीकोनातून एखादया राष्ट्राची उपयुक्तता, मित्रता किंवा शत्रूता केवळ विचारसरणीच्या आधारावर ठरविण्याची व त्या दृष्टिकोनातून आंतरराष्ट्रीय राजकारणाकडे पाहण्याची अमेरिकेची वृत्ती मागे पडली. अर्थिक हितसंबंधांनी राजकीय हितसंबंधांवर मात केली. त्यामुळे जगात जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण उदयास आले. परिणामी, वास्तववादाच्या आधारावर हितसंबंधांना केंद्रस्थानी ठेवणारे धोरण भारत आणि अमेरिका दोघांकडूनही आखले गेले. अनेक क्षेत्रात हितसंबंधांची परस्पर व्यापकता आणि समान राजकीय ध्येय या दोन्ही लोकशाहीवादी राष्ट्रांना एकत्र आणण्यात उपयुक्त ठरले.(देवळाणकर, 2011,80) त्यातच दक्षिण आशियातील बदललेली भू–राजकीय समिकरणे, चीनचे वाढते सामर्थ्य, भारताची भू–सामरिक स्थिती व वाढते सामर्थ्य, आंतरराष्ट्रीय दहशतवादाचे आव्हान अशा घटकांनी भारत–अमेरिका परस्पर सहकार्याची पार्श्वभुमी तयार केली. त्यामुळे अमेरिकेचा भारताविषयीच्या शीतयुध्दकालीन ष्टिकोनात बदल होऊन त्यात गुणात्मक परिवर्तन झालेले दिसून येते. प्रस्तृत शोध निबंधात शीतयुध्दोत्तर काळातील भारत–अमेरिका संबंधांचे गुणात्मक मुल्यमापन करण्यात आलेले आहे.

**शीतयुध्दोत्तरकाळ आणि अमेरिकन धोरण :**

1991 मध्ये सोव्हिएत रशियाचे विघटन होवून जगातील शीतयुध्द समाप्त झाले. त्यावेळी जागतिक स्तरावर अमेरिकेला कोणीही प्रतिस्पर्धी नसल्यामुळे जगात अमेरिका एक सुपरपॉवर राष्ट्र म्हणून उदयास आले. शीतयुध्दोत्तर काळात परिस्थिती झपाटयाने बदलली. शीतयुध्दाच्या ष्टिकोनातून जागतिक राजकारणाकडे पाहण्याची अमेरिकेची वृत्ती मागे पडली, आणि वास्तववादावर आधारीत जागतिक राजकारणावर आपला प्रभाव कायम टिकवून ठेवण्याच्या दृष्टिकोनातून अमेरिकेने आपल्या शीतयुध्दोत्तर परराष्ट्र धोरणाची आखणी केली. यात प्रामुख्याने अमेरिकेच्या महासत्ता स्थानाला आव्हान देणाऱ्या घटकांना सत्ता संतुलनाच्या विविध माध्यमातून नियंत्रित करणे, हे अमेरिकेन परराष्ट्र धोरणाचे मुख्य उद्दिष्ट निश्चित करण्यात आले. त्यानुसार अमेरिकेचे परराष्ट्र धोरण निर्धारकाचे दोन गट पडतात. यातील एक गट मवाळ धोरणाचे समर्थन करतो. या गटाच्या विचारसरणीनुसार, अमेरिकेने अन्य स्पर्धक राष्ट्रांबरोबर मैत्री व सहकार्याचे धोरण ठेवावे. कारण या माध्यमातूनच जागतिक शांतता व सुरक्षितता कायम राहील आणि सहकार्याच्या माध्यमातूनच अमेरिकेचे अर्थिक, राजकीय, सामरिक संबंध टिकून राहतील. तसेच अमेरिकेने अन्य राष्ट्रांच्या राजकीय, प्रशासकीय व्यवस्थेवर

**प्राचार्य, कै.अण्णासो.पि.एस.वाडीले कला महाविद्यालय, थाळनेर, ता.शिरपुर, जि.धुळे ( महाराष्ट्र )*
***सहायक प्राध्यापक, कै.न्हानाभाऊ म.तु.पाटील कला महाविद्यालय, मारवाड़, ता.अमळनेर, जि.जळगांव ( महाराष्ट्र )*

लक्ष केंद्रीत न करता तेथे अस्तित्वात असलेल्या शासनयंत्रणेसोबत जुळवून घ्यावे. तेथे लोकशाही शासनयंत्रणा प्रस्थापित करण्याच्या वादात पडू नये. मात्र अमेरिकेतील परराष्ट्र धोरण निर्धारकांचा दुसरा गट हा जहाल धोरणाचे समर्थन करतो. या गटाच्या मते, अमेरिकेने आपले महाशक्तीशाली राष्ट्राचे स्थान कायम टिकवून ठेवण्यासाठी आक्रमकपणे अन्य राष्ट्रांना सामरिकष्टिकोनातून नियंत्रीत करावे. जगात लोकशाही शासन यंत्रणा कायम स्थापण्याचे प्रयत्न करावेत. अन्य राष्ट्रांना नियंत्रित व अंकीत करण्यासाठी भू–राजकीय, लष्करी व सामरिक प्रतिरोधन निर्माण करावे. अन्य राष्ट्रांना आपले "सामरिक प्रतिस्पर्धी" (Strategic Competitor) म्हणून वागवावे. अशा आक्रमक परराष्ट्र धोरणाचा जहालमतवादी पुरस्कार करतात. (देवळाणकर,2011,80)

अमेरिकन परराष्ट्र धोरण निर्धारकांच्या उपरोक्त विचारसरणीनुसार अमेरिकेने बदलती आंतरराष्ट्रीय परिस्थिती व काळानुसार आपले दक्षिण आशियायी परराष्ट्र धोरण निर्धारित केलेले दिसून येते. यात अमेरिकेने शीतयुध्दोत्तर काळात दक्षिण आशियाकडे केवळ उप–खंडात्मक दृष्टिकोनातून पाहायला सुरुवात केली. (महापात्र,1998,164) या उप–खंडात्मक ष्टिकोनाच्या आधारावरच अमेरिकेने दक्षिण आशियातील महासत्ता होवू पाहणाऱ्या भारताविषयीची धोरणे नव्याने आखलेली दिसून येतात.

**शीतयुध्दोत्तरकाळातील भारत–अमेरिका संबंध :**

शीतयुध्दकाळात दक्षिण आशियात अमेरिकेच्या हस्तक्षेपाला भारताचा विरोध राहिला होता. भारत–पाकिस्तान यांच्यातील संघर्ष व पाकिस्तान–अमेरिका मैत्री यामुळे अमेरिकेचा दक्षिण आशियात प्रवेश झाला. त्यामुळे शीतयुध्दाचे राजकारण दक्षिण आशियात आले. परंतु भारताचे परराष्ट्रधोरण, अलिप्ततावाद, तटस्थता आणि शांततामय सहअस्तित्व यावर आधारित असल्याने भारत महाशक्तींपासून अलिप्त राहीला होता. कालांतराने शीतयुध्द संपले आणि महाशक्ती ठरलेल्या अमेरिकेने शीतयुध्दोत्तर काळात दक्षिण आशिया विषयीच्या धोरणाची आखणी केली. अमेरिकेच्या या दक्षिण आशियायी धोरणाची विभागणी अभ्यासक पुढीलप्रमाणे तीन टप्प्यात करतात.

**(अ) 1991 ते 1998 चा पहिला टप्पा :** याकाळात अमेरिकेने दक्षिण आशियात अर्थिक उदारीकरण आणि लोकशाहीचा प्रसार या उद्देशांना प्राधान्य दिले.

**(ब) 1998 ते 20001 चा दुसरा टप्पा :** या काळात अमेरिकेने दक्षिण आशियाई राष्ट्रात अण्वस्त्र प्रसारबंदीच्या उद्देशाला प्राधान्य दिले. कारण भारताने मे 1998 मध्ये पाच व लगेच पाकिस्तानने सहा अशा अकरा अण्विक चाचण्या दक्षिण आशियात घेण्यात आल्याने या प्रदेशाचा उल्लेख "न्युक्लिअर फ्लॅशपॉईंट" म्हणून होवू लागला. तसेच भारत पाकिस्तान दरम्यान कारगिल संघर्ष घडून आल्याने अमेरिकेने या प्रदेशात विशेष लक्ष घातले. अमेरिकन राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांनी भारत भेट घेवून नविन धोरणांना दिशा दिली.

**(क) 11 सप्टेंबर 2001 नंतरचा तिसरा टप्पा :** 11 सप्टेंबर 2001 रोजी अमेरिकेवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर अमेरिकेचा दक्षिण आशिया विषयीचा तिसरा टप्पा सुरू होतो. यात आंतरराष्ट्रीय दहशतवादाचे केंद्र पश्चिम आशियाकडून दक्षिण आशियात स्थलांतरीत झाल्यामुळे दक्षिण आशियात दहशतवादाचे प्रतोधन करण्याला अमेरिकेने प्राधान्य दिले. (श्रीवास्तव,2002,19)

अमेरिकेच्या या नविन दक्षिण आशिया धोरणात भारताचे महत्व वाढले आहे. कारण दक्षिण आशियातील सुरक्षितता आणि आशिया खंडात आर्थिक व उर्जाविषयीच्या हितसंबंधांचे संरक्षण ही सध्या भारताच्या परराष्ट्र धोरणातील दोन प्रमुख उद्दिष्टे आहेत. या दोन्ही उद्दिष्टांच्या सफलतेसाठी भारताला आखाती प्रदेश ते दक्षिण पूर्व आशिया या क्षेत्रात आपला प्रभाव निर्माण करावा लागणार आहे. (देवळाणकर,2011,83) त्यासाठी भारताला अमेरिकेची मैत्री लाभदायक ठरणार आहे. या दोन्ही राष्ट्रांमधील परस्पर सामारिक समानतेमुळे भारत अमेरिका संबंधांमध्ये शीतयुध्दोत्तरकाळात सहकार्य वाढलेले दिसते. त्याच बरोबर भारतातील लोकशाही शासन व्यवस्थेतील सातत्य, भारताने राबविलेला आर्थिक उदारीकरणाचा कार्यक्रम आणि त्यातुन अमेरिकेसाठी निर्माण झालेल्या आर्थिक आणि व्यापारी संधी, हिंदी महासागराचे वाढते व्यापारी आणि सामरिक महत्व व या महासागरातील भारताचे भौगोलिक केंद्रस्थान, चीनचे आशियातील वाढते भू–सामरिक महत्व, चीनी नौदलाचा हिंदी महासागरातील वाढता हस्तक्षेप त्याच बरोबर आंतरराष्ट्रीय दहशतवाद निमुर्लन मोहीमेत भारताचा सक्रीय सहभाग, यासारख्या दक्षिण आशियायी प्रश्नांमध्ये व भारत आणि अमेरिका यांच्या अनेक हितसंबंधंमध्ये आलेली परस्परपूरकता या दोन्ही राष्ट्रांना एकत्र आणणारी ठरली. तसेच दहशतवादाचा प्रतिकार करण्यापासून ते चीनच्या वाढत्या सामर्थ्याचे प्रतिरोधन करण्यापर्यंत अनेक क्षेत्रांमध्ये भारत अमेरिकेचे दक्षिण आशियातील हितसंबंध पुरक आहेत. साहजिकच शीतयुध्दोत्तर काळातील बदलत्या आव्हानांना पेलण्यासाठी भारत अमेरिका संबंध मैत्रीपूर्ण झालेले दिसून येतात.

**भारत–अमेरिका संबंधांचे मुल्यमापन :**

आशिया खंडातील अमेरिकेची सामरिक उद्दिष्टे भारताच्या उद्दिष्टांशी सुसंगत आहेत. सद्दस्थितीत अमेरिकेला आशिया खंडातील आपल्या चार हितसंबंधांच्या पूर्ततेसाठी भारताची मदत हवी आहे. त्यात– **(1)** आंतरराष्ट्रीय दहशतवादाचा सामना करण्यासाठी. **(2)** अण्वस्त्रप्रसार विरोधासाठी **(3)** समुद्रमार्गांच्या संरक्षणासाठी. **(4)** चीनच्या वाढत्या भू–राजकीय सामर्थ्यांचा सामना करण्यासाठी. या चार क्षेत्रात भारताचे सहकार्य प्राप्त करण्यासाठी उभय राष्ट्रां मध्ये 1993 ते 2007 या काळात विविध पातळयांवर चर्चा आणि करारांच्या अनेक फेऱ्या झाल्या आहेत. त्यातून भारत अमेरिका संबंधात सातत्याने वृध्दी होतांना दिसून येते. शीतयुध्दोत्तर काळात भारत अमेरिका यांच्या संबंधातील स्थित्यंतराचे श्रेय माजी राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांना जाते. क्लिंटन यांनी त्यांच्या कार्यकाळात भारत–अमेरिका मैत्री आणि सहकार्याचा पाया रोवला, तर त्याला वृध्दींगत करण्याचे काम राष्ट्रध्यक्ष बुश यांनी केले. अमेरिकेतील सेंटर फॉर स्ट्रॅटेजिक ॲन्ड इंटरनॅशनल स्टडीजच्या संचालिका टेरेसिटा शंकर यांच्यामते, जॉर्ज बुश यांना खात्री होती की, "आशिया आणि संपूर्ण विश्वातील विकसनशिल विश्वरचनेला आकार देण्यात भारत महत्वाची भूमिका बजावेल. तसेच उदारमतवादी लोकशाहीच्या प्रसारात आणि लोकशाही राष्ट्रांमध्ये संवाद वाढविण्यात भारताची भूमिका महत्वाची असेल". त्याचप्रमाणे अमेरिकेचे भारतातील राजदूत डेव्हिड मुलफोर्ड यांनीही भारत अमेरिका संबंध सुधारण्यात जॉर्ज बुश यांचे योगदान मान्य करीत, बुश यांच्या भारतीय धोरणांविषयी

म्हटले होते की, "बुश यांना अमेरिकेचे भारताबरोबरचे संबंध पुढील वीस वर्षांच्या काळात युरोप पेक्षाही अधिक महत्वाचे बनावे असे वाटत होते." (हिंदुस्तान टाइम्स,2,2008) त्याकरीता राष्ट्राध्यक्ष बुश यांनी भारताबरोबर आर्थिक, व्यापारी संबंधांबरोबरच राजकीय, लष्करी आणि सामरिक संबंध प्रस्थापीत करण्यावर भर दिला. त्याचबरोबर भारताची उर्जा समस्या सोडविण्याच्या ष्टिकोनातुन पोखरण अणुचाचणी – 1974 व 1998 पासून भारतावर लादलेले अण्विक, आर्थिक व व्यापारी बंधने दुर करीत भारतासोबत "नागरी अणु सहकार्य करार – 123" केला. त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताच्या अण्विक कार्यक्रमाला अधिमान्यता मिळून भारतास एक अण्विकशक्ती संपन्न राष्ट्राचा दर्जा प्राप्त झाला. यावरून बुश हे भारताला एक जबाबदार अण्वस्त्रधारी राष्ट्र म्हणून पाहतात हे सिध्द होते. एकंदरीत भारत–अमेरिका यांच्यातील वाढती मैत्री आणि सहकार्य यामुळे केवळ दक्षिण आशियाच्या राजकारणाला वेगळा आशय प्राप्त झालेला नाही तर, त्याचे परिणाम संपूर्ण आशियाखंडातील सत्ता संतुलनाच्या राजकारणावर झालेले दिसून येतात.

**सारांश :**

अमेरिकेच्या वाढत्या भारत प्रेमामागे अमेरिकेचे हिसंबंध गुंतलेले आहेत, हे भारत जाणून आहे. कारण, अमेरिका एक प्रोफेशनल राष्ट्र आहे. अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणात भाव भावनेला स्थान नसते. जेथून आपल्याला जास्तीत जास्त फायदा होईल आणि आपले महासत्ता स्थान कायम टिकून राहील अशा प्रश्नात अमेरिका सहभागी होत असते. कारण अमेरिकेची परराष्ट्र धोरण ठरविण्याची प्रक्रीया व्यक्ती केंद्रीत नसून संस्थाकेंद्रीत आहे. त्यामुळे अमेरिकेतील शासन हे रिपब्लिक पक्षाचे असो की डेमोक्रॅटीक पक्षाचे, परराष्ट्र धोरणची पायाभूत व दिर्घकालीन उद्दिष्टे कायम राहतात. जो थोडाफार बदल होतो, तो अल्पकालीन उद्दिष्टांमध्ये. ही उद्दिष्टे अल्पकालीन व परिस्थितीनुरूप असल्यामुळे तत्कालीन शासनव्यवस्था किंवा राष्ट्राध्यक्ष त्यात थोडाफार बदल करू शकतो. त्यानुसार, अमेरिकेचे आशिया खंडातील हितसंबंध जोपासण्यात भारताचे भू–सामरिक महत्व राष्ट्राध्यक्ष बुश यांनी ओळखले होते. त्यामुळे त्यांच्या कार्यकाळात अनेक अमेरिकन वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भारताला भेटी देवून परस्पर सामरिक संबंध विकसीत करण्यावर भर दिलेला दिसून येतो. यावरून भारत–अमेरिका संबंधात शीतयुध्दोत्तरकाळात गुणात्मक परिवर्तन झालेले दिसून येते. परिणामी आशिया खंडातील आणि जगातील विकसनशील विश्वरचना ठरविण्यात या दोन राष्ट्रांमधील मैत्री व सहकार्य महत्वपुर्ण भुमिका बजावणार आहे.

***<u>संदर्भ</u> :***


*(1) देवळाणकर, शैलेंद्र (2011) : समकालीन जागतिक राजकारण, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.*

***(2)*** *महापात्र, चिंतामणी (1988) : इंडो–अमेरिकन रिलेशन्स ऑन दि थ्रेशहोल्ड ऑफ दि टेंटिफर्स्ट सेंच्युरी, स्ट्रॅटेजिक ॲनॅलिसिस, खंड 22, क्र. 2, कोनार्क पब्लिशर्स, नवी दिल्ली.*

***(3)*** *श्रीवास्तव, बी. के. (2002) : इंडो–अमेरिकन रिलेशन्स सिन्स सप्टेंबर 11, वर्ल्ड फोकस, 2002.*

***(4)*** *हिंदुस्थान टाइम्स, मुंबई आवृत्ती, नोव्हेंबर, 2, 2008.*

***(5)*** *तोडकर, बी.डी. (2010) : भारत आणि जग, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.*

***(6)*** *देवळाणकर, शैलेंद्र (2014) : आंतरराष्ट्रीय संबंध, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.*

***(7)*** *फडिया, बी. एल. (2009) : आंतरराष्ट्रीय संबंध, साहित्य भवन पब्लिकेशन, आगरा.*

***(8)*** *गजराज, पद्मसिंह (2014) : भारत–अमेरिका सम्बन्ध–123 समझौता, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली.*